लोकमत



# विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

अकोट : येथील शिवाजी ज्युनिअर कनिष्ठ महाविद्यालयात नुकतीच सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू, भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली शीतल साखरे, नेहा टेरे, सुमित सपकाळ व अनिकेत भुडके या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत, ऑनलाइन फसवणूक, वाढता सोशल मीडियाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाइन खरेदी या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक वालसिंगे होते. यावेळी हा कार्यक्रम क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल मुंबई यांच्या सहयोगाने व अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू, भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली शीतल साखरे, नेहा टेरे, सुमित सपकाळ, अनिकेत भुडके यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक वालसिंगे, शिक्षक कडू, गावंडे, चौधरी, हिंगणकर आदी कर्मचारी उपस्थित होते.